# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय, कार्यालय मुंबई.

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
Email- jtdirrom@gmail.com Website – : www.jdteromumbai.com

**कार्यालयीन आदेश**

क्र.४/विकामुं/तंशि/पार्श्वनाथ/स्थलांतर/२०१३/237
दिनांक 17 JAN 2013

प्रति,
प्राचार्य,
सर्व संबंधीत संस्था
(सोबतच्या यादी प्रमाणे)

विषय :- पार्श्वनाथ चॅरीटेबल ट्रस्टचे, पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ,कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे या संस्थेतील विद्यार्थ्यांना अन्य संस्थेत स्थलांतरीत करणेबाबत ( प्रथम वर्ष विद्यार्थी )

संदर्भ :- १ . संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी /२०१२/९ दिनांक ०३/जानेवारी/२०१३

२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक ४/विकामुं/तांशा/पार्श्वनाथ/स्थलांतर/२०१३/१८१ दिनांक ०७/जानेवारी/२०१३

३. संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र. २/एनजीसी /२०१२/४४ दिनांक ०८/जानेवारी/२०१३

पार्श्वनाथ चॅरीटेबल ट्रस्टचे, पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ,कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे या संस्थेतील विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठांतर्गत मान्यता प्राप्त विनाअनुदानीत अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्थेत स्थलांतरीत करण्यासाठी संचालनालयाने संदर्भिय पत्रान्वये निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने आपल्या संस्थेत सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे विद्यार्थ्यांना (पार्श्वनाथ चॅरीटेबल ट्रस्टचे, पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ,कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे या संस्थेमधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ) त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार व गुणवत्तेनुसार एक विशेष बाब म्हणून खालील अटि व शर्तीनुसार संस्था स्थलांतराने प्रवेश देण्याचे या कार्यालयामार्फत निर्देश देण्यात येत आहे. (संदर्भ क्रमांक १ नुसार शासनाचे मान्यतेच्या अधिन राहून)

१ शैक्षणिक वर्ष २०१२-१३ चे उर्वरित शैक्षणिक कामकाज जसे सत्र कार्य पुर्ण करुन घेणे, परीक्षा अर्ज स्विकारणे इत्यादि बाबी स्थलांतरीत संस्थेमार्फत पुर्ण करण्यात यावे .पुढील शैक्षणिक सत्रात अधिकचे वर्ग झाल्यास संबंधीत संस्थेने विद्यापीठशी संपर्क साधून तसे अधिकच्या वर्गाचे आयोजन करावे.

२ सद्यस्थितीत प्रथम सत्र पुर्णत्वाच्या मार्गावर असल्याने त्याप्रमाणात त्यांची शैक्षणिक शुल्क इत्यादि वजाती करुन उर्वरित शुल्क विद्यार्थ्यांना पार्श्वनाथ चॅरीटेबल ट्रस्टचे, पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे या संस्थेने परत करावी .

३ स्थलांतरीत केलेल्या संस्थ्रेचे लागू असलेले शैक्षणिक शुल्क वर नमुद केलेल्या प्रमाणात शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून नियमानुसार विद्यार्थ्यांना स्थलांतरीत संस्थेत भरणे आवश्यक राहील .तसेच त्यांना शैक्षणिक सवलती मिळत असल्यास यापुढेही सुरु राहतील .(मागास वर्गीय विद्यार्थी, टी.एफ.डब्ल्यु.एस. अंतर्गत , अल्पसंख्यांक इत्यादि)

४. अनुतीर्ण विद्यार्थ्यांचे स्थलांतर विद्यापीठाच्या नियमांच्या अधिन राहून करण्यात येत आहे. आपल्या संस्थेमध्ये स्थलांतरीत केलेल्या विद्यार्थ्यांपैकी जे अनुत्तीर्ण (ATKT नसलेल्या/ड्रापआऊट)आहेत अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज हे आपल्या संस्थेमार्फत स्विकारुन विद्यापीठास सादर करावेत . तसेच अशा विद्यार्थ्यांना ते ज्या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाच्या नियमानुसार पुढील वर्गात पात्र होतील त्या शैक्षणिक वर्षात अशा विद्यार्थ्योना आपल्या संस्थेत प्रवेश निश्चित करावा. तसेच विद्यार्थ्यांचे मुळ कागदपत्रे आपल्या स्तरावर तपासून घेण्यात यावेत.

५. विद्यार्थ्यांचे ओळखपत्र , विद्यापीठाचा एनरोलमेंट क्रमांक ,सत्र परीक्षेच्या गुणपत्रिका , इत्यादि तपासून विद्यापीठाच्या पात्रतेनुसार सबंधीत वर्षात स्थलांतरीत करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश स्थलांतरीत केलेल्या संस्थेने निश्चित करण्यात यावे .

६. जे विद्यार्थी पुर्विच्या संस्थेत प्रात्यक्षिक विषयात अनुत्तीर्ण आहेत अशा विद्यार्थ्यांचे पुर्विच्या संस्थेत जे सत्र कार्य पुर्ण केले आहे , त्या विषयातील सत्र कार्याचा दस्ताऐवज प्राप्त करुन जतन करावा व प्रात्यक्षिक परिक्षेच्या वेळेस आवश्यकते नुसार परिक्षा घेण्यासाठी परिक्षकांना सादर करावा.

७. दिनांक २४/०१/२०१३ पर्यंत प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी दिनांक २९/०१/२०१३ रोजी ईमेलद्वारे या कार्यालयास jtdirrom@gmail.com वर सादर करण्यात यावी.

( जी बी धनोकार )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत :- १. संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य , मुंबई यांना संदर्भिय पत्रास अनुसरुन माहितीस्तव सादर
२. कुलसचिव , मुंबई विद्यापीठ , मुंबई यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी सादर
३. मा. परिक्षा नियंत्रक ,मुंबई विद्यापीठ , महात्मा फुले भवन, विद्यानगरी, कलीना, सांताक्रुझ पुर्व मुंबई यांना माहितीस्तव सादर
४. प्राचार्य, पार्श्वनाथ चॅरीटेबल ट्रस्टचे, पार्श्वनाथ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ,कासारवडवली, घोडबंदर रोड, ठाणे यांना कळविण्यात येते की, त्यांनी विद्यार्थ्यांना तात्काळ आवश्यक ती गुणपत्रीका व कागदपत्रे द्यावीत, विद्यापीठासबंधीत कागदपत्रे /विद्यार्थ्यांनी यापुर्वि केलेले सत्र कार्य अहवाल निकालाची प्रत इत्यादि संपुर्ण तपशिलासहीत सबंधीत संस्थांना देण्यात यावीत व आवश्यक ती कार्यवाही करावी . तसेच चालू शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये प्रथम वर्ष प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रथम सत्र पुर्णत्वाच्या मार्गावर असल्याने त्याप्रमाणात त्यांची शैक्षणिक शुल्क इत्यादि वजाती करुन उर्वरित शुल्क विद्यार्थ्यांना परत करावे
५ . संबंधीत विद्यार्थी ( सहसंचालकांच्या **www.jdteromumbai.com** संकेतस्थळावर उपलब्ध ) त्यांना कळविण्यात येते की , त्यांनी तात्काळ संबंधीत स्थलांतरीत संस्थेत प्रवेश घ्यावा . कोणत्याही विद्यार्थ्यास पनश्चः संस्थाबदल करुन देण्यात येणार नाही. सबंधीत संस्थेमध्ये मुदतीत प्रवेश न घेतल्यामुळे त्याचे शैक्षणिक नुकसान झाल्यास सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील याबाबत नोंद घ्यावी . (दिनांक २४/०१/२०१३ पर्यंत प्रवेश निश्चित करावा.)

D/Parshwanath /Parshwananath

Date : 18/01/2013

**List of Students Proposed for Institute Transfer from Parshwanath Engg. College Thane To Other Un-Aided Institutes In Mumbai region**

**Year & Course :- First Year Instrumentation**

| Sr.No. | Name of the Students | Institute Code | Alloted Institute |
|---|---|---|---|
| 1 | KUMATGI ABHAY RAJENDRA | EN3185 | Vivekanad Institute of Technology, Chembur |
| 2 | MISHRA AMAN SHYAM SUNDER | EN3185 | Vivekanad Institute of Technology, Chembur |
| 3 | Sawant Tejas Krishna | EN3194 | Vidyavardhini College of Engineering, Vasai |
| 4 | KAMAT KUNAL SAMIR | EN3174 | Ramrao Adik Institute of Technology, Nerul |

**List of Students Proposed for Institute Transfer from Parshwanath**
**Year & Course :- First Year IS (Dropper)**

| Sr.No. | Name of the Students | Institute Code | Alloted Institute |
|---|---|---|---|
| 1 | Bapusaheb D. Gawali | EN3174 | Ramrao Adik Institute of Technology, |
| 2 | Prachi V. Panbude | EN 3135 | Rajiv Gandhi Instt.of Tech. Andheri |
| 3 | Kranti R. Mankame | EN 3212 | watumal College of Engg.Worli |
| 4 | Elairaja Somu | EN 3194 | Vidyavardhini College of Engineering, Vasai |
| 5 | Singh Pradeep | EN 3135 | Rajiv Gandhi Instt.of Tech. Andheri |
| 6 | Dhabale Prashant Pralhad | EN3185 | Vivekanad Institute of Technology, Chembur |
| 7 | Shukla Rahul Sureshchand | EN 3135 | Rajiv Gandhi Instt.of Tech. Andheri |
| 8 | Meriya harshad Ratnabhai | EN 3135 | Rajiv Gandhi Instt.of Tech. Andheri |
| 9 | Patil Harish S. | EN 3189 | Bharti Vidyapeeth.Kharghar |

Note :- Please report to the allotted institute urgently & secure your admission before 24/01/2013

for Joint Director,
Technical Education, Mumbai Region,
Mumbai